


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११२। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार । १०/०५/२०२६ । पान - ६




## सुवेंदू अधिकारी बंगालमध्ये भाजपचे पहिले मुख्यमंत्री



कोलकत्ता (वृत्तसंस्था)

सुवेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पक्षाचे पहिले मुख्यमंत्री बनले आहेत. त्यांनी देवाच्या नावाने बंगाली भाषेत शपथ घेतली. शपथेनंतर, सुवेंदू यांनी पंतप्रधानांजवळ जाऊन त्यांना वंदन केले.

सुवेंदू यांच्या व्यतिरिक्त, बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी इतर पाच आमदारांना मंत्री म्हणून पदाची शपथ दिली. यामध्ये दिलीप घोष, अग्निमित्र पॉल, अशोक कीर्तनिया, खुदीराम टुडू आणि निशित प्रमाणिक यांचा समावेश होता. पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि एनडीए व भाजपशासित राज्यांचे २० मुख्यमंत्री उपस्थित होते. मोदींनी मंचावर रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर पंतप्रधानांनी मंचावर ९८ वर्षीय भाजप कार्यकर्ते माखनलाल सरकार यांचा सन्मान केला. मंचावर आल्यावर पंतप्रधान थेट सरकार यांच्याकडे गेले, त्यांना शाल पांघरली आणि नंतर त्यांच्या पायांना स्पर्श केला.

# गर्भलिंग निदानाचा घृणास्पद व्यवसाय

## पुण्यापर्यंत पोहोचले रॅकेटचे धागेदोरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर : लोणीच्या पिंपरी निर्मळ परिसरात उघडकीस आलेल्या बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, या अमानुष रॅकेटचा तपास दिवसेंदिवस अधिक गंभीर व धक्कादायक वळण घेत आहे. मुलगा-मुलगी भेदाच्या विकृत मानसिकतेतून सुरू असलेल्या या काळ्या व्यवसायात डॉक्टर, एजंट आणि काही कुटुंबीयांचा थेट सहभाग समोर आल्याने समाजमन हादरले आहे. या प्रकरणातील आरोपींच्या पोलीस कोठडीत न्यायालयाने १० मेपर्यंत वाढ केली असून तपास यंत्रणांनी आता या रॅकेटची मुळे पुण्यापर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट केले आहे.

अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या तपासात आतापर्यंत तब्बल १२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात दोन डॉक्टर, चार एजंट आणि सहा गर्भवती महिलांच्या पतींचा समावेश आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपाताच्या जाळ्याचा मोठा पर्दाफाश झाला.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात एका गोपनीय माहितीवरून झाली. पिंपरी निर्मळ शिवारातील निळवंडे कॅनॉल परिसरात एका बंद खोलीत गुप्तपणे गर्भलिंग निदान चाचण्या केल्या जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. महिलांकडून प्रत्येकी १० हजार रुपये घेऊन हे बेकायदेशीर कृत्य सुरू असल्याचे समोर आले. त्यानंतर अपर पोलीस अधीक्षक कार्यालय आणि लोणी पोलीस स्टेशनच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध सापळा रचून धाड टाकली आणि या भीषण रॅकेटचा पर्दाफाश केला.



या कारवाईत सुरुवातीला नेवासा येथील डॉ. राहुल आबासाहेब भणगे आणि अभिजीत दिलीप भुसाळ यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून साडेचार लाख रुपये किमतीचे पोर्टेबल सोनोग्राफी मशिन, रोख रक्कम तसेच तीन आलिशान चारचाकी वाहने असा तब्बल २४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या मशिनच्या माध्यमातून फिरत्या पद्धतीने गुप्त ठिकाणी गर्भलिंग निदान चाचण्या केल्या जात असल्याचे तपासात स्पष्ट झाले.

पुढील चौकशीत या रॅकेटचे धागेदोरे श्रीरामपूरपर्यंत पोहोचले. तपासात श्रीरामपूर आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र कुटे, तसेच प्रदीप ढगे आणि निलेश भवर या एजंट्सचा सहभाग समोर आला. पोलिसांनी तातडीने या तिघांनाही अटक केली. विशेष म्हणजे, डॉ. कुटे यांना बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात अटक करण्यात आली असून, लिंग निदानानंतर गर्भपात केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.

तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली आहे. या रॅकेटमध्ये वापरले जाणारे पोर्टेबल सोनोग्राफी मशिन पुण्यातील दोन व्यक्तींकडून खरेदी करण्यात आले होते. या दोघांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके कामाला लागली असून, त्यांना लवकरच ताब्यात घेण्यात येणार असल्याची माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली.

या टोळीची कार्यपद्धती अत्यंत गुप्त आणि नियोजनबद्ध होती. एजंट प्रथम विविध भागांतून ८ ते १० गर्भवती महिलांना संपर्क करून तयार करत असत. ठराविक संख्या पूर्ण झाल्यानंतर एक दिवस आणि वेळ निश्चित केली जात असे. महिलांना त्यांच्या पती किंवा नातेवाईकांसह बोलावले जाई. त्यानंतर प्रथम रोख रक्कम स्वीकारली जात असे. पुढे महिलांच्या नातेवाईकांना एका ठिकाणी थांबवून एजंट त्या महिलांना स्वतःच्या वाहनातून दुसऱ्या गुप्त ठिकाणी घेऊन जात असत. तिथे पोर्टेबल मशिनद्वारे गर्भलिंग निदान केले जाई आणि काही वेळानंतर महिलांना पुन्हा त्यांच्या नातेवाईकांकडे आणून सोडले जात असे.

या काळ्या व्यवहारात डॉक्टरला प्रत्येकी १० हजार रुपये, तर एजंटला सुमारे ३ हजार रुपये मिळत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. (पान २ वर)

## अहिल्यानगर जिल्ह्यात इतर तालुक्यांना कोट्यावधींची मदत

# संगमनेरला एक रुपयाही नाही, आंदोलनाचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)-

संगमनेर - लोकनेते तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना कायम पीकविमासह विविध मदती मिळाल्या. मात्र सध्याच्या सत्ताधाऱ्यांमुळे इतिहासात प्रथमच ० टक्के पिक विमा मिळाल्याने शेतकऱ्यांची मोठी घोर निराशा झाली असून आर्थिक नुकसान झाले असून हा विद्यमान सत्ताधाऱ्यांकडून संगमनेरच्या शेतकऱ्यांशी खेळलेला डाव आहे अशी टीका किसान काँग्रेसचे अध्यक्ष आनंद वर्पे यांनी केली आहे.

शेतकरी पिक विमा बाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात आनंद वर्पे व तालुक्यातील विविध शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, संगमनेर तालुका हा क्षेत्रफळाने मोठा आहे तालुक्यामध्ये पठार भाग, प्रवरा भाग आणि तळेगाव पट्टा असे तीन भौगोलिक भाग येतात. विस्ताराने मोठा असूनही लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना कायम मदत मिळत राहिली. याला तालुक्यातील सर्व शेतकरी जामीन आहेत मात्र मागील दीड वर्षापासून बदललेल्या राजकारणामुळे तालुक्यातील विकास कामांवर कायम अन्याय होत असून मिळणाऱ्या मदतीमध्ये ही संगमनेर तालुक्याला जाणीवपूर्वक उपेक्षित ठेवले जातात. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ११८ कोटींचा पिक विमा मंजूर झाला यामध्ये राहता तालुक्याला १३ कोटी कोपरगाव तालुक्याला नऊ कोटी अकोले तालुक्याला एक कोटी श्रीरामपूर तालुक्याला १७ कोटी राहुरी तालुक्याला सहा कोटी अशी रक्कम मिळाली मात्र संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांची वाट लावताना या सरकारने १ रुपयाही पीक विमा दिला नाही.

सध्याचे नवीन लोकप्रतिनिधी व पालकमंत्री फक्त जाहिरात बाजी आणि विकास कामांची सोशल मीडियातून प्रसिद्धी करत आहे. मात्र कोणत्याही गावांमध्ये कुठेही कोणतेही विकासकाम सुरू नाही. शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळत नाही. धार्मिकतेच्या आणि जातीभेदाच्या नावावर राजकारण सुरू असून हे अत्यंत दुर्दैवाचे आहे. सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली आहे. काही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या अडचणी निर्माण झाल्या आहे. अशावेळी नवीन लोकप्रतिनिधीने काकडवाडी सारख्या ठिकाणी टँकर पाठवून फक्त सोशल मीडियावर प्रसिद्ध केली आणि टँकर बंद केले. याउलट राजहंस दूध संघाने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभ राहतानी पठार भागातील वाड्यावर पाणी पुरवले. या सगळ्या परिस्थितीमध्ये संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांवर सातत्याने जाणीवपूर्वक मोठा अन्याय केला जात असून पिक विमा मध्ये ० मदत मिळाली आहे. ही शेतकऱ्यांची केलेली क्रूर थट्टा असून यापुढील काळात तमाम शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा संगमनेर तालुक्यातील सर्व गावांमधील शेतकऱ्यांनी दिला आहे.

# वारकरी घुसखोर संग्राम भंडारेची विकास लवांडे यांच्यावर शाईफेक

पुणे (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर शनिवारी सकाळी पुणे जिल्ह्यातील आळंदी परिसरात शाईफेक करण्यात आल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. वारकरी संप्रदायात कथित घुसखोरी झाल्याचा मुद्दा गेल्या काही दिवसांपासून आक्रमकपणे मांडणाऱ्या लवांडे यांच्यावर हा हल्ला झाल्याने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, विकास लवांडे हे आळंदी मातोबा (ता. हवेली) येथे एका धार्मिक कार्यक्रमानिमित्त प्रवचनासाठी गेले होते. सकाळी सुमारे १० वाजण्याच्या दरम्यान प्रवचन आटोपून ते पुण्याकडे परतत असताना, संग्राम भंडारे आणि काही गोरक्षकांनी त्यांच्या वाहनाचा पाठलाग करून निर्जनस्थळी अडवले. तीन वाहनांमधून आलेल्या १० ते १५ जणांच्या समूहाने लवांडे यांच्यावर शाईफेक केली तसेच धक्काबुक्की केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यावेळी हल्लेखोरांपैकी काही जणांकडे पिस्तूल होते आणि त्यांनी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोपही लवांडे यांनी केला आहे. घटनेनंतर त्यांनी तातडीने लोणीकाळभोर पोलिस ठाणे गाठत संग्राम भंडारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली. माझ्यावर हल्ला करणाऱ्या गुंडांवर कठोर कारवाई झाल्याशिवाय मी पोलिस स्टेशन सोडणार नाही, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आहे.



घटनेनंतर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओमध्ये विकास लवांडे यांनी संपूर्ण घटनाक्रम सांगताना म्हटले की, मी प्रवचन आटोपून पुण्याकडे निघालो असताना काही जणांनी माझी गाडी अडवली. मला जबरदस्तीने खाली उतरवून अंगावर शाई ओतण्यात आली. मला मारहाण व धक्काबुक्की करण्यात आली. दोन जणांकडे बंदुका होत्या. त्यांनी मला ठार मारण्याची धमकी दिली.

दरम्यान काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी वारकरी संप्रदायात प्रतिगामी आणि धर्मांध विचारांच्या लोकांची घुसखोरी होत असल्याचा गंभीर आरोप केला होता. समतेचा आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या वारकरी चळवळीची दिशा बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर विकास लवांडे यांनी या मुद्यावर आक्रमक भूमिका घेत कथित घुसखोर कीर्तनकार आणि प्रवचनकारांची यादी जाहीर केली होती.

या यादीत किशोर व्यास उर्फ गोविंद देवगिरी, संभाजी भिडे, संग्राम भंडारे, तुषार भोसले, अक्षय भोसले, प्रकाश जवंजाळ, ज्ञानेश्वर जळकीकर, चैतन्य महाराज देगलूरकर, योगी निरंजन यांच्यासह अनेकांची नावे नमूद करण्यात आली होती. या व्यक्ती वारकरी संप्रदायाच्या सामाजिक समतेच्या विचारांना बाधा पोहोचवत असल्याचा आरोप लवांडे यांनी केला होता.









# लेफ्टनंट जनरल सुब्रमणी देशाचे नवे CDS

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल एन एस राजा सुब्रमणी (सेवानिवृत्त) यांना देशाचं पुढचं चीफ ऑफ डिफेंस स्टाफ म्हणून नियुक्त केलं आहे. वर्तमान सीडीएस जनरल अनिल चौहान यांची जागा ते घेतील. ३० मे २०२६ रोजी अनिल चौहान यांचा कार्यकाळ समाप्त होणार आहे. पदभार स्वीकारल्यानंतर लेफ्टनंट जनरल सुब्रमणी सैन्य विषयक विभाग सचिव म्हणून काम करतील. लेफ्टनंट जनरल सुब्रमणी यांची सैन्यातील कारकिर्द शानदार आहे. सध्या ते राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात सैन्य सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. याआधी ते सैन्य उपप्रमुख आणि मध्य कमान जीओसी इन सी सारख्या महत्वपूर्ण पदांवर काम केलं आहे. थिएटर कमांड आणि सशस्त्र सैन्य दल यांचं एकत्रीकरण करण्याची प्रक्रिया पुढे नेण्यात त्यांची



भूमिका महत्वाची असेल.

लेफ्टनंट जनरल सुब्रमणी नॅशनल डिफेन्स अकादमी, जॉइंट सर्विसेज कमांड एंड स्टाफ कॉलेज (यूके) आणि नॅशनल डिफेन्स कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी किंग्स कॉलेज लंडनमधून मास्टरची डिग्री मिळवली आहे. लेफ्टनंट जनरल सुब्रमणी यांना १९८५ साली गढवाल रायफल्समध्ये कमिशन मिळालं. या दरम्यान वाइस एडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांची भारतीय नौदलाचे पुढचे प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते ३१ मे रोजी पदभार स्वीकारतील. त्यांचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत असेल.मावळते सीडीएस जनरल अनिल चौहान यांची पाकिस्तान विरुद्ध ऑपरेशन सिंदूरमध्ये महत्वाची भूमिका होती. रणनितीक निर्णय, शस्त्रास्त्र खरेदी, तिन्ही सैन्य दलांच्या गरजा यात सीडीएसचा रोल महत्वाचा असतो. नौदल, एअरफोर्स आणि लष्कर या तिन्ही सैन्य दलांमध्ये उत्तम समन्वय रहावा यासाठी केंद्र सरकारने सीडीएस या पदाची निर्मिती केली आहे. ऑपरेशन सिंदूरच्यावेळी तिन्ही सैन्य दलांमध्ये सीडीएसमुळे उत्तम समन्वय राखता आला. थिएटर कमांडवर तिन्ही सैन्य दलात एकमत घडवणं हे नव्या सीडीएससमोरील मुख्य लक्ष्य असेल. याआधी जनरल बीपिन रावत देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ होते. पदावर असताना हेलिकॉप्टर अपघातात त्यांचं निधन झाले होते.

# भू-संपादन प्रक्रियेत पारदर्शकता राखून मोबदला वितरण तातडीने करा - पालकमंत्र्यांचे आदेश

युवावार्ता (जिल्हा माहिती कार्यालय)

अहिल्यानगर - सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखून कामकाज करण्यात यावे. जमीन संपादन करताना संबंधित जमिनीबरोबरच त्या ठिकाणी असलेली झाडे, विहिरी, पाईपलाईन तसेच इतर मालमत्तांचे मूल्यांकन अचूक व निश्चित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावे. मूल्यांकन प्रक्रियेत कोणतीही तफावत राहणार नाही व शासनाच्या निश्चित कार्यपद्धतीत कोणताही बदल होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग निवाड्यांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, माणिक आहेर, अरुण उंडे, किरण सावंत-पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी अतुल चोरमारे, सायली सोळंके, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक मिलिंदकुमार वाबळे, व्यवस्थापक सत्यम राय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, महामार्गासाठी आवश्यक असलेल्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्यात यावे. संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत. जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला मोबदल्याचा निधी कोणताही विलंब न लावता त्वरित वितरित करण्यात यावा. मोबदला वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून पात्र लाभार्थ्यांना वेळेत रक्कम मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून या प्रकल्पामुळे वाहतूक, उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे. प्रकल्पग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पाचही तालुक्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तालुकानिहाय माहिती घेत प्रलंबित विषय तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती देताना सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या अहिल्यानगर, संगमनेर, राहुरी, राहाता व जामखेड या ५ तालुक्यातील ६५ गावांमधून हा महामार्ग जात असून जिल्ह्यातील याची लांबी १३९.५१ किलोमीटर एवढी आहे. या महामार्गासाठी १०४४ हेक्टर आर क्षेत्रापैकी ४११.९०८ हेक्टर आर क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रियेबाबत प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व समन्वय करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजी महाग

मुंबई (वृत्तसंस्था)

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे पर्याय म्हणून सीएनजीकडे वळलेल्या वाहनचालकांना आता मोठा आर्थिक फटका बसत आहे. सीएनजीच्या दरात पुन्हा एकदा वाढ झाल्याने वाहनधारकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल मध्यरात्रीपासून सीएनजीच्या दरात प्रतिकिलो १.५० ने वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे कालपर्यंत एका किलो सीएनजीसाठी ९३.६५ मोजणाऱ्या ग्राहकांना आता ९५.१५ इतकी रक्कम भरावी लागत आहे.

दरम्यान, सीएनजीसाठी पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, वाहनचालकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. अशातच दरवाढ झाल्यामुळे सीएनजी हा स्वस्त इंधनाचा पर्याय राहिलेला नाही, अशी भावना अनेक ग्राहकांकडून व्यक्त केली जात आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत कमी खर्चिक म्हणून सीएनजी वाहनांना पसंती मिळत होती. मात्र सातत्याने होणाऱ्या दरवाढीमुळे आता वाहनचालकांचे मासिक आर्थिक बजेट कोलमडू लागले आहे. वाढत्या इंधनदरांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये नाराजी वाढताना दिसत आहे.

# मराठी भाषेची घसरण चिंताजनक

## दहावीच्या निकालातून वास्तव समोर



मुंबई (वृत्तसंस्था)

एका बाजूला महाराष्ट्रात रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्यावरून राजकीय आणि सामाजिक पातळीवर मोठे वादंग सुरू आहेत. मात्र, दुसरीकडे आपल्याच राज्यात मराठी भाषेची क्षणिक अवस्था किती चिंताजनक आहे, हे नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालावरून (डडउ ठर्शीीश्रीं २०२६) चव्हाट्यावर आले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शुक्रवारी ऑनलाईन निकाल जाहीर केला. यंदा तब्बल १२ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आणि राज्याचा एकूण निकालही ९२ टक्क्यांच्या घरात गेला. पण या आनंदोत्सवात महाराष्ट्राला अंतर्मुख करणारी बाब म्हणजे, 'प्रथम भाषा' म्हणून मराठीचा अभ्यास करणाऱ्या १० लाख ८७ हजार ६९९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ८० हजार ८०३ (सुमारे ७ टक्के) विद्यार्थी नापास झाले आहेत. एवढेच नाही तर, द्वितीय आणि तृतीय भाषा म्हणून मराठी निवडलेल्या ४ लाख १३ हजार ९१७ विद्यार्थ्यांपैकी १३ हजार ७४१ विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरले आहेत. मायबोलीतील ही घसरण महाराष्ट्रासाठी एक अत्यंत गंभीर आणि धोक्याचा इशारा मानली जात आहे.मराठी विषयात एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी नापास का होत आहेत? यावर शिक्षणतज्ज्ञांनी गांभीर्याने चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, आजच्या विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाचा प्रचंड अभाव आहे. तसेच, मोबाईल आणि सोशल मीडियाच्या जमान्यात विद्यार्थ्यांच्या शुद्धलेखनात भयंकर चुका होत आहेत, ज्याचा थेट फटका बोर्डाच्या परीक्षेत बसत आहे. आजच्या पिढीला मराठी भाषेची गोडी लावण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतीने शिकवून चालणार नाही, तर शिक्षकांच्या शिकवण्याच्या तंत्रातही आमूलाग्र बदल करण्याची नितांत आवश्यकता आहे. याशिवाय, सध्या केवळ दहावीपर्यंतच मराठी विषय अनिवार्य आहे; मात्र त्यात कायद्याने सुधारणा करून ही सक्ती थेट बारावीपर्यंत वाढवावी अशी आग्रही मागणी आता शिक्षणतज्ज्ञांकडून जोर धरू लागली आहे.

# मनोज जरांगे सरकारविरोधात पुन्हा मैदानात

जालना (वृत्तसंस्था)

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शुक्रवारी मराठा समाजाच्या न्याय मागण्यांसाठी पुन्हा एकदा एक मोठे आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाची तारीख ते १६ मे रोजी आंतरवाली सराटीत आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत घोषित करणार आहे. या सरकारला कितीही मायेने बोलले, तरी ते आपले अश्रू पुसणार नाही. त्यामुळे त्याला दयामाया न दाखवता आंदोलन केले, तरच न्याय पदरात पडेल, असे ते आपल्या आगामी आंदोलनाची माहिती देताना म्हणालेत.



मनोज जरांगे आज पत्रकारांशी बोलताना म्हणाले, मी मराठा समाजाला पूर्वीपासूनच एकजुटीने राहण्याचे आवाहन करत आहे. तुम्ही या सरकारला असे कितीही पोटतिडकीने सांगितले, कितीही मायेने सांगितले तरी, ते कधीही आपल्या डोळ्यांचे अश्रू पुसणार नाही. तुम्हाला आंदोलनाच्या पवित्र्यात यावे लागेल, पण कट्टरतेने यावे लागणार आहे. तुम्हाला सरकारची किंवा इतर कोणत्याही राजकीय पक्षाची दयामाया दाखवता येणार नाही. असे झाले तरच न्याय पदरात पडू शकतो, अन्यथा नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना व्याजाचा परतावा मिळत नाही. त्यामुळे मराठा समाजातील अनेक तरुण उद्योजक आर्थिक अडचणीत सापडलेत. जरांगे यांनी यावरही भाष्य केले. ते म्हणाले, आपण १६ मे रोजी पुढील आंदोलनाची घोषणा करणार आहोत. याविषयी आंतरवाली सराटीत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. आपण या राज्यात खूप मोठे आंदोलन उभे करणार आहोत. त्याची तारीख १६ तारखेला घोषित केली जाईल. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील व व्यवस्थापकीय संचालक यांच्यातील वादाची आतली गोष्ट मला माहिती नाही.

पण कोण अध्यक्ष, कोण एमडी यापेक्षा या गोष्टीला सर्वस्वी सरकार जबाबदार असते. त्यांना अधिकार हे सरकार देते आणि सरकारलाच कामे होऊ द्यायची नाही. त्यांना अध्यक्ष व एमडी या दोघांनाही बदनाम करायचे आहे. सरकारची हीच भूमिका आहे. हे डावपेच या दोघांनीही ओळखले पाहिजेत. पण यात मराठा समाजाचे वाटोळे होत आहे. तो भरडला जात आहे.ो

# रखडलेल्या अनुदानावरून बच्चू कडू पुन्हा आक्रमक



मुंबई (वृत्तसंस्था)

शिवसेनेत प्रवेश करून अवघ्या दहा दिवसांत विधान परिषदेवर निवडून आलेले बच्चू कडू आता पुन्हा आक्रमक भूमिकेत दिसत आहेत. राज्यातील दिव्यांग आणि नेत्रहीन बांधवांना मिळणारे संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान गेल्या काही महिन्यांपासून रखडल्याने बच्चू कडूंनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच इशारा दिला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा मंत्रालयावर आंदोलन छेडावे लागेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. त्यामुळे राजकीय वर्तुळातही या भूमिकेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

राज्य सरकारकडून ४० टक्क्यांपेक्षा अधिक दिव्यांगत्व असलेल्या पात्र नागरिकांना संजय गांधी निराधार योजनेतून दरमहा अडीच हजार रुपयांचे मानधन दिले जाते. मात्र फेब्रुवारीपासून हजारो दिव्यांगांना हे पैसे मिळाले नसल्याचे समोर आले आहे. सलग फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल या तीन महिन्यांचे अनुदान थांबल्याने अनेक दिव्यांग आर्थिक संकटात सापडले आहेत. विशेषतः नेत्रहीन नागरिकांवर याचा मोठा परिणाम झाला असून रोजच्या जगण्यासाठीही त्यांना संघर्ष करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या सुमारे ५० नेत्रहीन बांधवांनी मुख्यमंत्री सचिवालय गाठत आपली व्यथा मांडली. घरभाडे, वीजबिल, औषधोपचार आणि रोजच्या गरजा भागवताना प्रचंड अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक नेत्रहीन नागरिक रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि सार्वजनिक ठिकाणी गोळ्या, बिस्किटे किंवा छोट्या वस्तू विकून उदरनिर्वाह करतात. शासनाच्या अडीच हजार रुपयांच्या मदतीवर त्यांचे जीवन अवलंबून असताना तीच मदत बंद झाल्याने त्यांच्यासमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

# संगमनेर बस स्थानकातील प्रवासी समस्यांवर सकारात्मक चर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर बस स्थानक हे मध्यवर्ती व भव्य असून या ठिकाणाहून प्रवास करणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. प्रवाशांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता त्यांचे निर्मूलन करणे कामी विविध प्रश्नासंदर्भात आगर व्यवस्थापक प्रशांत गुंड यांचे समवेत नुकतीच संगमनेर तालुका प्रवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक होऊन निवेदन देण्यात आले.

निवेदनात, नवीन व आधुनिक (ई- व्हि/लग्झरी) बसेसची उपलब्धता करण्यात यावी, संगमनेरात एस. टी. स्मार्ट कार्ड साठी शासनाने निश्चित केलेली शुल्क आकारणी करावी, खेड्यापाड्यातून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या वेळेचे गांभीर्य लक्षात घेता संगमनेर बस स्थानक ते अमृतवाहिनी कॉलेज शटल बस सुरू करावी बस स्थानकात पार्किंग स्टँड सुरू करावे, स्थानिक पोलिस चौकी चोवीस तास कार्यान्वित असावी, प्रवाशांच्या तक्रारी साठी सूचना पेटी असावी आदी विषयासंदर्भात आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड यांच्याबरोबर सकारात्मक चर्चा होऊन काही प्रश्नांबाबत सूचना करून अंमलबजावणी करण्यात आली तर काही प्रश्न प्रक्रियेमध्ये असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीस, संगमनेर तालुका प्रवासी संघटनेचे अध्यक्ष- अनिल भोसले, उपाध्यक्ष- संजय क्षत्रिय, सचिव-नितीन मोहोळे, खजिनदार- मुर्तूजा बोहरी, प्रसिद्धी प्रमुख- लहानु सदगीर, विवेक मुळे, सुरेश डंग, सचिन गणोरे, विनोद गायकवाड, बंटी यादव, शांताराम आडेप, दिलीप गायकवाड, बी. के. गायकवाड, एजाज शेख, शशीभाऊ पगारे, रवींद्र नवले, बाळासाहेब शेळके, विशाल ढोले आदी उपस्थित होते.

# ७३ कोटी घोटाळ्यात आणखी 'बडे मासे' रडारवर

बीड (वृत्तसंस्था)

जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या ७३ कोटींच्या भूसंपादन घोटाळ्यात अटक करण्यात आलेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना न्यायालयाने १५ मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या अटकेमुळे खळबळ उडाली असतानाच, आता तपासाची सुई एका महिलेसह आणखी तीन 'बड्या माशांकडे' वळली आहे. हे संशयित सध्या पोलिसांसमोर येण्याचे टाळत असल्याची माहिती आहे. शुक्रवारी न्यायालयातील पाठकांच्या वकिलांचा तांत्रिक मुद्दा तपासाला वळण देणार असल्याचे दिसते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे मोठे विधान, म्हणाले. या घोटाळ्यात एका महिलेसह आणखी तीन बडे संशयित पोलिसांच्या रडारवर आहेत. पोलिस सध्या त्यांच्याविरुद्ध तांत्रिक पुरावे आणि कागदपत्रे हस्तगत करण्याचे काम करत असून, लवकरच यातील 'बडे मासे' गळाला लागण्याची चिन्हे आहेत. अविनाश पाठक २२ एप्रिल २०२५ रोजी बीडमधून कार्यमुक्त झाले होते. मात्र, ते गेल्यानंतर त्यांच्या कार्यकाळातील मागील तारखा वापरून १५४ प्रकरणांमधील वाढीव मोबदल्याचे बनावट आदेश काढण्यात आले. यातून शासनाची ७३ कोटी ४ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. सहायक पोलिस अधीक्षक आयपीएस एम. व्यंकटराम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सुमारे २,५०० कॉल रेकॉर्डिंग व सह्यांच्या फॉरेन्सिक पडताळणीनंतर ही कारवाई केली आहे. या घोटाळ्यात महसूल कर्मचारी आणि वकिलांसह एकूण १० जणांवर गुन्हे दाखल आहेत.

# गर्भलिंग निदानाचा घृणास्पद...

पान १ वरून - पोलिसांनी अनेक महिलांची ओळख पटवली असून, त्यांचे जबाब नोंदवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, काही महिलांनी दिलेल्या जबाबातून आणखी धक्कादायक माहिती समोर आली आहे. गर्भलिंग निदानानंतर किमान तीन महिलांचे गर्भपात करण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून, हे गर्भपात अटक करण्यात आलेल्या डॉक्टरांच्या दवाखान्यात एजंट्सच्या मदतीने करण्यात आल्याचा आरोप आहे. या उघडकीमुळे केवळ बेकायदेशीर गर्भलिंग निदानच नव्हे, तर स्त्री भ्रूणहत्या आणि वैद्यकीय नैतिकतेचा घोर भंग करणारे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या कारवाईनंतर जिल्ह्यातील अवैध वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी भीती निर्माण झाली असून, या रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा सहभाग आहे, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. पोलीस तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे या अमानवी साखळीतील आणखी धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोशल मीडियाच्या गैरवापरावर नियंत्रणासाठी उच्चस्तरीय समिती

मुंबई (वृत्तसंस्था)

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर करून पुराव्यांविना केली जाणारी बदनामी आणि त्यातून निर्माण होणारे गंभीर सामाजिक प्रश्न विचारात घेऊन राज्य सरकारने शुक्रवारी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. समाजमाध्यमांवरील अशा स्वैर प्रकरणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सध्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करून प्रभावी उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची घोषणा गृह विभागाने केली आहे.




राज्यात सोशल मीडियावरून बदनामी करण्याचे प्रमाण वाढल्याने समाजातील सर्व घटकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६-अ रद्द झाल्यानंतर निर्माण झालेली कायदेशीर पोकळी भरून काढण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. विद्यमान कायद्यात सुधारणा करणे किंवा राज्याचा स्वतंत्र कायदा आणणे शक्य आहे का, याची तांत्रिक व कायदेशीर पडताळणी करण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली आहे. (ऊशषरारींळेप ेप ीेलळरश्र ाशवळर)या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे पोलीस महासंचालक असतील. त्यांच्यासोबत विधि व न्याय, माहिती तंत्रज्ञान आणि महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव हे सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळतील, तर अपर पोलीस महासंचालक (राज्य सायबर) हे या समितीचे सदस्य सचिव असतील. ही समिती प्रामुख्याने सर्वोच्च न्यायालयाने श्रेया सिंघल विरुद्ध भारत सरकार (२०१५) आणि पिपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज' (२०२२) खटल्यांमध्ये दिलेल्या निर्देशांचा सखोल अभ्यास करेल. तसेच सोशल मीडियाच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी कायद्याची परिणामकारकता वाढवण्याबाबत सरकारला ठोस शिफारशी सादर करेल.समितीला गरजेनुसार या क्षेत्रातील तज्ज्ञांना बैठकीसाठी आमंत्रित करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून पुढील तीन महिन्यांच्या आत या समितीला आपला सविस्तर अहवाल आणि शिफारशी गृह विभागाला सादर करायच्या आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे सोशल मीडियावरील बदनामीच्या सत्राला कायदेशीर चाप बसण्याची शक्यता निर्माण झाली असून, यामुळे खोट्या आरोपांना बळी पडणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.













# विकासकामांतून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहर बनविणार - पालकमंत्री विखे

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-

बदलत्या काळानुसार शहरांची रचना आणि सुविधा विकसित करणे ही काळाची गरज असून, नावीन्यपूर्ण विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहराची ओळख मिळवून द्यावी. सामान्य नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत सार्वजनिक सुविधा, आधुनिक बाजारपेठा आणि सार्वजनिक उद्यानांसारख्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. शहरातील चितळे रोड येथे नेहरू मार्केटचे भूमिपूजन पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.




पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, नेहरू मार्केटची स्थापना १९६७ साली झाली असून, या बाजारपेठेने शहराच्या व्यापारी विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज या मार्केटला नव्या स्वरूपात ऊर्जितावस्था प्राप्त होत आहे. शहर झपाट्याने बदलत असताना जुन्या शहराच्या पाऊलखुणा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विकास करताना शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विसरून चालणार नाही, असेही ते म्हणाले. लोकांच्या गरजा वाढत असून, बदलत्या परिस्थितीनुसार शहराची उभारणी करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगार क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शहरातील सुविधा आणि पायाभूत विकासाची दिशा निश्चित करावी लागणार आहे. आधुनिक बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांसाठी दर्जेदार नागरी सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे. शहरात अधिकाधिक सार्वजनिक उद्याने उभारण्यास प्राधान्य देण्यात यावे, यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत असून, शहर अधिक सुशोभित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांसाठीही आधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वतंत्र मार्केट उभारण्याची आवश्यकता आहे. कृषी उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

नावीन्यपूर्ण प्रयोग आणि नियोजनबद्ध विकासातून शहराचे स्वरूप बदलता येणार असून, अहिल्यानगरला राज्यातील आदर्श आणि अग्रगण्य शहर म्हणून विकसित करण्यासाठी विकासकामांना गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सुमारे ९ कोटी ३४ लक्ष रुपयांच्या निधीतून तळमजल्यासह तीन मजली मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये ५७ गाळे व ५३ ओटे बांधण्यात येणार आहेत. व्यापाऱ्यांना या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधाही देण्यात येणार आहेत. कार्यक्रमास पदाधिकारी, व्यापारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वासनेचे बीज जळूनी जाय। मग रामनामी उपजे आवडी

## संत विचारांचा सहवास सोडू नका : ह.भ.प. कर्पे महाराज

**संत चरण रज लागता सहज ।**
**वासनेचे बीज जळवूनी जाय ।। १।।**
**मग रामनामी उपजे आवडी ।**
**सुख घडोघडी वाढू लागे ।।२।।**
**कंठी प्रेम दाटे नयनी निर लोटे ।**
**हृदयी प्रगटे रामरूप ।।३।।**
**तुका म्हणे साधन सुलभ गोमटे ।**
**परी उपतिष्टे पूर्वपुण्य ।।४।।**

युवावार्ता (सदाशिव मुळे) - संगमनेर- शहराच्या जनता नगरमध्ये सुरू असलेल्या हरिभक्त परायण बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह कीर्तन महोत्सव सोहळ्यात कीर्तन रुपी दुसरे पुष्प गुंफतांना हरिभक्त परायण बाळकृष्ण महाराज कर्पे यांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा संतांचे महत्त्व विशद करणारा अभंग सेवेसाठी घेतला.



या अभंगाचा सरळ अर्थ असा आहे की संतांची संगती इतकी महान आहे की त्यांचा सहज जरी सहवास घडला तरी दुर्धर असणारी वासना जी आपणाला भगवंताच्या प्राप्तीत आड येते व जन्म मरणाच्या फेऱ्यात अडकवते. ती बिजासह जळून जाते. वासना नष्ट झाली तरच मग जीवाला त्या भगवंताचे नाम गोड लागते व त्या नावाने ब्रह्मसुखाचे अनुभूती येते आणि मग त्या भक्ताला एक उच्च अवस्था प्राप्त होते. ज्यामुळे हृदयी प्रेम उत्पन्न होऊन नयनातून प्रेमाश्रू वाहू लागतात. तुकाराम महाराज म्हणतात हे साधन सोपे व हिताचे आहे पण ते पूर्व पुण्य असेल तरच हे सर्व घडून येईल.

**जनतानगर**
**अखंड हरीनाम सप्ताह**
**किर्तन महोत्सव सोहळा**
**जनतानगर, संगमनेर**



**दि. ०८/०५/२०२६ वेळ दुपारी ४- ते ५.३०**
**आदिशक्ती मुक्ताई व संत चोखामेळा संगीत चरित्र कथा**
**कथाकार - रामाणाचार्य ह.भ.प.तुषार महाराज खातळे**

| आजचे हरिकिर्तन | दि.१०/०५/२०२६ |
|---|---|
| ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर | ह.भ.प. कविराज महाराज झावरे, पारनेर |

संतांचे महत्त्व विशद करताना हरिभक्त परायण बाळकृष्ण महाराज कर्पे यांनी संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज, संत निळोबाराय, संत चांगदेव महाराज यांच्या अभंगातून संतांचे मोठेपण,त्यांचा सहवास व त्यामुळे होणारा मानवाचा उद्धार व परमेश्वर प्राप्तीची सर्व प्रक्रिया सांगणारे विविध अभंगातील प्रमाणांद्वारे संतांचे महत्त्व विशद केले. तसेच संत कोणाला म्हणावे याचे अभंगाद्वारे दाखले दिले. आपल्या निरूपणात कर्पे महाराजांनी सांगितले की नाम, ज्ञान, वैराग्य, शांती व गुरूनिष्ट ही महत्त्वाची पाच तत्वे संतांनी आपल्याला अनुभवातून सर्व सामान्य माणसांना उद्धारासाठी दाखवून दिलेले आहे. भक्ती मार्गातून संतांनी परमेश्वर प्राप्तीची वाट सोपी करून दिली आहे.आपण संतांचे विचार आचरणात आणून त्यांनी दिलेल्या मार्गाने वाटचाल केली तर भगवत प्राप्ती होऊन आपला उद्धार होईल. संत संगती हे परमात्मा परमार्थाचे पहिले आणि शेवटचे साधन आहे. ते सुलभ आणि गोमटे आहे. पण ते लाभण्यासाठी पूर्व पुण्य लागते म्हणून सतत संतांचे विचार, ग्रंथ आणि सज्जनांचा, संतांचा सहवास सोडू नये.

# कळसेश्वर विद्यालयचा दहावीचा निकाल १०० टक्के



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील कळसेश्वर विद्यालय, कळसचा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे. विद्यालयातून विशेष प्राविण्यामध्ये १० व प्रथम श्रेणीतून २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातून सार्थक गणेश वाकचौरे ८५.४० टक्के गुण मिळवून प्रथम, अनुष्का सुनिल आवारी ८५.०० टक्के गुणांसह द्वितीय, आयुष संजय वाकचौरे ८४.८० टक्के गुणांसह तृतीय, रोहन बाळासाहेब वाकचौरे ८२.८० टक्के गुणांसह चतुर्थ, रोशन रावसाहेब वाकचौरे ८२.८० टक्के गुणांसह चतुर्थ, तर आयुष नवनाथ वाकचौरे ८२.२० टक्के गुण मिळवून पंचम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे, शिवाजी आवारी, मच्छिंद्र साळुंखे, गीतांजली खरबस, केशव महाले, मनीषा शिंदे, प्रशांत जाधव, प्रतीक्षा घुले, कुमार पालवे, सुरेश वाघमारे आदींचे मार्गदर्शन लाभले.

# आ. खताळ यांच्या वाढदिवसानिमित्त गोशाळेत चारा वाटप




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार अमोल खताळ यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश काळे व मित्र परिवाराच्या वतीने सायखिंडी येथील पांजरपोळमध्ये गोमातेसाठी एक ट्रॅक्टर भर मका चारा वाटप करण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

विशेष म्हणजे रमेश काळे व मित्र परिवाराने सलग दुसऱ्या वर्षी हा उपक्रम राबवून सामाजिक कार्याची परंपरा कायम राखली आहे. वाढदिवस साजरा करताना समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

यावेळी निलेश घोडेकर, गणेश आहेर, पिनुभाऊ ठोसर, किरण खांडरे, अभिषेक काळे, निकुंज ढोले, आवेश बेपारी, कय्युम पिंजारी, योगेश जाधव, चांगदेव खतोडे, अनिल ढोले, सुनील ढोले, दिपक ढोले आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘कोटा’ लातूरचे ग्लॅमर सोडा, स्थानिक संस्थेवर विश्वास ठेवा : डॉ. प्रवीण शिगंणारे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

आजच्या स्पर्धात्मक युगात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या मुलांची संख्या मोठी आहे. त्यासाठी नीट ही परीक्षा द्यावी लागते आणि त्या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी व ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी पालकांचा ओढा प्रामुख्याने राजस्थानमधील ‘कोटा’ किंवा लातूरसारख्या शहरांकडे असतो. मात्र, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे माजी संचालक डॉ. प्रवीण शिगंणारे यांनी या मानसिकतेला छेद दिला आहे. त्यांच्या मते, नीट परीक्षेच्या तयारीसाठी आता घरापासून दूर जाण्याची गरज उरलेली नाही. ते एका मुलाखतीत बोलत होते.

डॉ. शिगंणारे स्पष्टपणे सांगतात की, कोटा शहराला लाभलेले वलय हे केवळ एका ‘ग्लॅमर’चा भाग आहे. आज महाराष्ट्रात अनेक स्थानिक शैक्षणिक संस्था अशा आहेत, ज्या कोटा येथील संस्थांच्या तुलनेत अधिक दर्जेदार शिक्षण देत आहेत. पालकांनी केवळ नावाला न भुलता आपल्या मुलांच्या सोयीनुसार स्थानिक पर्यायांचा विचार करणे आवश्यक आहे. यशाची त्रिसूत्री : वेळापत्रक, शिक्षक आणि व्यवस्थापन कोणत्याही कोचिंग क्लासचे यश तिथल्या इमारतीवर नसून तीन मुख्य गोष्टींवर अवलंबून असते. नियोजित वेळापत्रक, अभ्यासाचे शिस्तबद्ध नियोजन. तज्ज्ञ शिक्षक (एक्सपर्ट टीचर्स), संकल्पना स्पष्ट करणारे अनुभवी मार्गदर्शक. उत्कृष्ट व्यवस्थापन (मॅनेजमेंट), विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सातत्यपूर्ण आढावा घेणारी यंत्रणा.

ज्या संस्थेकडे या तीन गोष्टींची भक्कम साथ आहे, ती संस्था कोटापेक्षाही उत्तम निकाल देऊ शकते. नीट परीक्षेची व्याप्ती मोठी आहे. आकडेवारीनुसार, एका जागेसाठी सरासरी २५ मुले स्पर्धेत असतात. ही स्पर्धा जिंकण्यासाठी ११ वी आणि १२ वी ही दोन वर्षे अत्यंत महत्त्वाची आहेत. पाया पक्का करण्यासाठी या दोन वर्षांतच गांभीर्याने तयारी करणे यशासाठी अनिवार्य आहे. डॉ. शिगंणारे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील संधींबाबत सकारात्मक चित्र मांडले आहे.

भारतीय डॉक्टरांना परदेशात प्रचंड मागणी असून, तिथे त्यांना अतिशय मानाचे स्थान आणि मोठे वेतन (पॅकेज) मिळते. एकीकडे स्पर्धा असली, तरी दुसरीकडे भारतात ‘सुपर स्पेशालिटी’च्या जवळपास ३,००० जागा दरवर्षी रिक्त राहतात. ही वस्तुस्थिती दर्शवते की, या क्षेत्रात संधींची कमतरता नाही, तर ती संधी शोधून देणाऱ्या योग्य शैक्षणिक संस्थांची गरज आहे.

विद्यार्थ्यांनी केवळ मोठ्या शहरांच्या नावामागे न धावता, आपल्या भागात उपलब्ध असलेल्या गुणवत्तापूर्ण संस्थांवर विश्वास ठेवावा. महाराष्ट्रात आता असे अनेक स्थानिक क्लासेस आहेत, जे जागतिक दर्जाचे मार्गदर्शन करत आहेत. जिद्द, चिकाटी आणि योग्य व्यवस्थापन यांच्या जोरावर विद्यार्थी आपल्या गावात राहूनही डॉक्टर होण्याचे स्वप्न साकार करू शकतात.

# स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपयेच द्यावे लागणार

## एसटी सवलतधारकांची लूट थांबणार : जादा दर घेणाऱ्यांचे परवाने रद्द होणार

अहिल्यानगर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

एसटी महामंडळाने सवलतधारकांसाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड देण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या योजनेत १९९ रुपयांत मिळणारे कार्ड एसटी - महामंडळाने ठेका दिलेल्या खासगी - कंपन्यांकडून २२० रुपयांना दिले - जात असल्याने प्रवाशांची लूट केली जात आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्यांनी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. त्यावर मंत्री सरनाईक यांनी जादा दराने कार्ड देणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तत्काळ रद्द करण्यात येतील, असा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सवलतधारक प्रवाशांसाठी म्हणजेच ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग यांना नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड स्मार्ट कार्ड उपलब्ध करून दिले आहे. नवीन एनसीएमसी कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे. यासाठी राज्यभरात तीन हजारांहून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रत्येक बसस्थानकावर हे कार्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. दरम्यान, राज्यात काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दूराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी परिवहनमंत्र्यांना प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने कार्ड काढताना गैरप्रकार आढळून आल्यास कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. जिल्ह्यात महिला, ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिक, ७५ वर्षांवरील अमृत योजनेतील लाभार्थी, तसेच इतर सवलतधारक मिळून लाखो नागरिक आहेत. प्रवासी नागरिकांकडून २० रुपये जादा आकारले जात असल्यास या माध्यमातून लाखो रुपयांची अतिरिक्त वसुली होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आतापर्यंत जिल्ह्यात सव्वा लाख नागरिकांनी स्मार्ट कार्डासाठी नोंदणी केलेली आहे. नोंदणी करताना पावती नियमाप्रमाणे १९९ रुपयांची दिले जाते. मात्र, आकारणी २२० रुपयांची केली जाते. त्यामुळे हा प्रकार गंभीर ठरत असून, आर्थिक गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी एसटी महामंडळाने कडक पावले उचलण्याची गरज आहे. दरम्यान, एसटी प्रशासनाने प्रवाशांच्या तक्रारी घेऊन त्यांचे पैसे संबंधितांकडून परत मिळवून द्यावे, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे. याबाबत एसटची प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रश्नावर प्रवाशी संघटनेने लक्ष देऊन पाठपुर करावा, अशी होत आहे. सवलतीत असणारे एनसीएमसी स्मार्ट कार्ड काढण्यासाठी एसटी महामंडळाने खासगी कंपन्यांना काम दिले आहे. मात्र, या कंपनींना नियमानुसार १९९ रुपये घेणे बंधनकारक आहे. जादा आकारणी करणाऱ्यांचे परवाने रद्द करण्यात येणार आहेत. असा इशारा राजेंद्र जगताप, (विभाग नियंत्रक, अहिल्यानगर) यांनी दिला.

# दहावी निकालात चणेगावच्या श्री रामेश्वर विद्यालयाची चमकदार कामगिरी

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील चनेगाव येथील श्री रामेश्वर विद्यालयाचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल यंदा शंभर टक्के लागला असून, विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला उजाळा दिला आहे.




विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यामध्ये गुणानुक्रमे प्रथम तीन विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. प्रथम क्रमांक : चि. सार्थक अविनाश लोहाळे - ४६० गुण (८१.४० टक्के), द्वितीय क्रमांक : कु. स्वामिनी प्रकाश पावडे - ३९१ गुण (७८.२० टक्के), तृतीय क्रमांक : कु. सायली नानासाहेब गुळवे - ३६० गुण (७३.६० टक्के).

विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि पालकांकडून विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# संपादकीय...

## उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता किती असते?

वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की, जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ, जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालकही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की, उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर, उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र-मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड-किल्ल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये, म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात. पण ही उन्हाळी शिबिरे आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत, या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का, याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. अनेकदा इतर पालक आपल्या मुलांना शिबिरात पाठवत आहेत म्हणून आपणही आपल्या मुलांना पाठवावे, अशी मानसिकता तयार झालेली दिसते. काही पालकांना मुलांच्या भवितव्याची चिंता असते, तर काही पालक मुलांचा वेळ मोबाईल, टीव्ही आणि व्हिडिओ गेमपासून दूर राहावा, यासाठी शिबिरांचा पर्याय निवडतात. मात्र, केवळ वेळ घालवण्यासाठी किंवा इतरांच्या प्रभावाखाली घेतलेला निर्णय योग्यच असेल असे नाही. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का, याचाही विचार पालकांनी करावा. कारण, तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अशा घटना अत्यंत दुर्दैवी असून, त्यातून पालकांनी आणि प्रशासनाने धडा घेण्याची गरज आहे. अनेक ठिकाणी केवळ आर्थिक फायद्यासाठी शिबिरे आयोजित केली जातात. मात्र, प्रशिक्षित मार्गदर्शक, सुरक्षा साधने, वैद्यकीय सुविधा, आपत्कालीन व्यवस्था याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का, याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली, तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. आज अनेक ठिकाणी आकर्षक जाहिराती करून पालकांना भुरळ घालण्याचा प्रयत्न केला जातो. मोठमोठी आश्वासने दिली जातात. मात्र, प्रत्यक्षात मुलांना दर्जेदार प्रशिक्षण मिळतेच असे नाही. काही शिबिरांमध्ये मुलांना फक्त वेळ घालवण्यासाठी विविध उपक्रम दिले जातात, तर काही ठिकाणी मुलांवर अनावश्यक दबावही टाकला जातो. त्यामुळे शिबिराचा दर्जा, प्रशिक्षकांचा अनुभव, मुलांची सुरक्षितता आणि वातावरण या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो, तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो. अर्थात, या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट, वर्षभर चालणाऱ्या विविध उपक्रमांतून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. एखाद्या मुलाला संगीताची आवड असेल, तर त्याने सातत्याने संगीत शिकणे अधिक उपयुक्त ठरते. एखाद्या मुलाला चित्रकला, खेळ किंवा अभिनयाची आवड असेल, तर त्यासाठी नियमित सराव आणि योग्य मार्गदर्शन गरजेचे असते. केवळ दहा-पंधरा दिवसांच्या शिबिरातून मोठे कौशल्य विकसित होईल, अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे ठरू शकते. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडिओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा, पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे. मात्र, पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको, तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा.


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची


# जिजामाता स्कूलचा एस.एस.सी. बोर्डाचा १०० टक्के निकाल

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- दि. ८ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेच्या निकालात जिजामाता स्कूलने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास व शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यामध्ये समृद्धी सातपुते (९३.००%), हर्षल कानवडे (९२.८०%), समृद्धी सोनवणे (९२.००%), अनुष्का पानसरे (८९.२०%), अपेक्षा रहाणे (८८.००%), शंतनू वायकर (८८.००%), सूरज अडांगळे (८७.६०%), क्षितिज जोंधळे (८३.८०%), आदित्य दिवे (८२.४०%), समृद्धी कुळधरण (७८.८०%), प्रद्युम्न नेहे (७४.८०%), अनन्या गायकवाड (७२.६०%), अर्णव नाईकवाडी (७२.६०%), विनयकुमार कुशवाह (७१.४०%), संविधान मोकळ (७०.८०%), अंजली केदारी (५५.८०%), चैतन्य जोंधळे (५१.८०%) अशाप्रकारे उत्कृष्ट गुणांनी विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

निकाल जाहीर होताच शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. शाळेच्या संस्थापक अध्यक्ष डॉक्टर माणिकराव शेवाळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले आहे. शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा व अभ्यास नियोजन करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला. पालकांनीही विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन दिल्यामुळे विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले.निकालानंतर शाळेत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शाळा प्रशासन, प्राचार्या, उपप्राचार्या, सर्व शिक्षकांनी पुढील वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# मालपाणी विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम

संगमनेर (प्रतिनिधी)- येथील शारदा शिक्षण संस्थेच्या मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालय (माध्यमिक), संगमनेर येथील सन २०२५-२६ च्या इयत्ता दहावीच्या बॅचचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यालयातील सर्व १४९ विद्यार्थी यशस्वी झाले आहे. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये पियुष राजू पिंगळे याने ९७.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. अथर्व प्रविण जगताप याने ९७.०० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. हर्षवर्धन अर्जुन भवार याने ९६.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. विनायक नंदू वाळुंज याने ९५.४० टक्के गुणांसह चतुर्थ क्रमांक, तर अपेक्षा भाऊसाहेब काकड हिने ९५.२० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक प्राप्त केला.

विद्यालयातील ९९ विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. गुणांच्या टक्केवारीनुसार, ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे २९ विद्यार्थी आहेत. विद्यालयात प्रथम क्रमांक प्राप्त झालेला विद्यार्थी पियुष पिंगळे हा राष्ट्रीय स्तरावरील रिंग टेनिस स्पर्धेतील विजेता ठरलेला राष्ट्रीय खेळाडू आहे. विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सक्षम विशेष असे मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. तसेच, विद्यालयास प्रशस्त क्रीडांगण उपलब्ध असून विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शनाची सुविधा दिली जाते. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, उपाध्यक्ष केदारनाथ राठी, सचिव सतीश लाहोटी, खजिनदार सुरेंद्रकुमार कासट, सहसचिव ॲड. ज्योती मालपाणी, सर्व संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार, सर्व शिक्षक-शिक्षकेतर सहकारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

संक्षिप्त जाहिरात

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, पनवेल (भिंगारी) ४१० २०६**

ई-मेल: panvel.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी क्रमांक : ०२२- २७४५२७७८

### ई-निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२६-२७

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (Authority) आणि मुख्य अभियंता (कोकण) तथा प्रकल्प संचालक (वासप्र) यांचे वतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.

पनवेल (भिंगारी) (दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८) हे बहुपक्षीय विकास बँकांच्या आर्थिक सहाय्याने ईपीसी मोडद्वारे हाती घ्यावयाच्या महाराष्ट्र राज्यामधील सोबतच्या टोओआरच्या (TOR) संलग्न परिशिष्ट IV मध्ये नमूद केलेल्या पॅकेजेसनुसार विविध रस्त्यांचे पक्क्या बाजूपट्यांसह (Paved Shoulders) दोन पदरी काँक्रीट रस्ते तयार करण्यासाठी व्यवहार्यता अभ्यासासह डीपीआर (DPR), सर्वेक्षण आणि भू-नकाशा तयार करणे, ज्यामध्ये सामाजिक, पर्यावरणीय आणि सोसीए (CCA) शमन अभ्यासाचा समावेश आहे, यासाठी सल्लागार सेवा नेमणे या कामांकरिता पात्र निविदाकारांकडुन दि.०८.०५.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता ते दि. २२.०५.२०२६ पर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत ऑनलाइन पध्दतीने निविदा मागवित आहेत.,

प्रस्तुत कामांची सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र (ईपीसी नमुन्यात) शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहू/डाउनलोड करु शकता. सविस्तर निविदा सूचना सा.बां. विभागाच्या www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक २२.०५.२०२६ (दुपारी १५ वाजेपर्यंत) असेल.

सदर कामाची एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत / रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखीव ठेवलेले आहेत. सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे**

| | |
|---|---|
| ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.२२.०५.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) |
| स्पष्टीकरणासाठी तांत्रिक मुद्दे ऑनलाईनद्वारे उपस्थित करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि.१४.०५.२०२६ सकाळी ११.०० वाजेपर्यंत |
| निविदापूर्व बैठकीचा दिनांक, वेळ व ठिकाण | मुख्य अभियंता (कोकण) व प्रकल्प संचालक (बासप्र) यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, बी-विंग, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१. दि.१४.०५.२०२६ दुपारी १२.०० वाजता (भारतीय वेळेनुसार) |
| निविदा प्रपत्र सेक्शन २, कलम ITB २१.१ नुसार हार्ड कॉपीमध्ये सादर करावयाचे दस्ताऐवजांचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण | निविदा पत्रकात नमुद केल्याप्रमाणे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात. दि.२५.०५.२०२६ (दुपारी १५.०० वाजेपर्यंत) (भारतीय वेळेनुसार) |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण | दि.२५.०५.२०२६ (दुपारी १५.०० वाजता) (भारतीय वेळेनुसार) (अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, नवीमुंबई यांचे कार्यालय) |

**जा.क्र.काअ/पनवेल/निविदा/......**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**
**सा.बां. विभाग, पनवेल**
**दिनांक :**

**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग,**
**पनवेल**


**ड्रायव्हर पाहिजे**

ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा

मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा

निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे

8668269897

**पाहिजेत**

वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे

अकौंटंट - ०२ जागा
पात्रता - बी.कॉम/ एम. कॉम

कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२ जागा,
पात्रता - बी. कॉम

एल.एम. व्ही. वाहन चालक - ०३ जागा, अनुभवी

वॉचमन - ०३ जागा

पत्ता- डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर

संपर्क - 9370071777
9518556933, 9822791484

**त्वरित पाहिजेत**

ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे

9421911671


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५२४/२०२६ संगमनेर, दिनांक - २३/०३/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. उमेर आरिफ अत्तार रा. निमोन, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २७/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. निमोन, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा भाचा नामे वसीम इसाक अत्तार यांचा जन्म मौजे निमोन, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १४/०५/१९८४ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी निमोन यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी निमोन यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिल कार्यालय, संगमनेर**
**क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६**
**दिनांक - ०८/०५/२०२६**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै. हौशीराम विश्वनाथ गांडाळ रा. मेगांळवाडी, ता. संगमनेर हे दिनांक २८/०१/२०२६ रोजी मौजे मेगांळवाडी ठिकाणी मयत झालेले असुन ते रा. कोपरगाव आगार येथे चालक या पदावर कार्यरत वेतनधारक होते. त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | ताईबाई हौशीराम गांडाळ | ४३ वर्ष | पत्नी |
| २. | तेजस हौशीराम गांडाळ | २५ वर्ष | मुलगा |
| ३. | तुषार हौशीराम गांडाळ | २१ वर्ष | मुलगा |

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारसपत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास श्रीमती. ताईबाई हौशीराम गांडाळ, रा. मेगांळवाडी, ता.संगमनेर जि. अहिल्यानगर यांना कुटुंब प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास श्रीमती. ताईबाई हौशीराम गांडाळ, रा. मेगांळवाडी, ता.संगमनेर जि. अहिल्यानगर यांचे अर्जावरुन दिली असे.

(स्वाक्षरी)
**तहसिलदार, संगमनेर**


**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

• आवश्यकता आहे •

**क्रशर सुपरवायझर पाहिजे**
(Crusher Supervisor)

- क्रशर प्लांटचे कामकाज पाहणे व सर्व ऑपरेटरवर देखरेख ठेवणे.
- मशीन चालू ठेवणे, प्रॉडक्शन व गुणवत्ता (Quality) याची जबाबदारी.
- मेंटेनन्स, साहित्य साठा व दैनिक नोंदी (Records) पाहणे.
- सुपरविजनचा अनुभव आवश्यक.

संपर्क (Stone Crusher) 8208878391 | संपर्क (Office) 9822684402

NKG Engineers & Govt Contractor

Crusher Kauthe Kamleshwar

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**

शोरुम, ऑफिस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे

ग्राऊंड फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर - १७०० स्क्वे. फुट

पत्ता - नाशिक-पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर

संपर्क - 7755965616, 9422737484

**पाहिजेत**

सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे

- टेलीकॉलिंग — 10 जागा
  फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार
  (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन — 10 जागा
  पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर — 02 जागा
  (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य )
- ड्रायवर - पगार- १५ हजार — 05 जागा
  (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00

**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

**पाहिजेत**

पसायदान चिल्ड्रन क्लिनिक ॲण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर

डॉक्टर - BAMS / BHMS (सकाळ-१, रात्री -१)
नर्स - ANM / GNM (सकाळी -१, दुपारी-१, रात्री -२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी -१, रात्री -१)

९९६०६१०६२३

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)

माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६






**नोकरीची संधी..!**

संगमनेर येथील मालपाणी उद्योग समूहाकरिता

MALPANI

**पाहिजेत!**

सिक्युरिटी गार्ड - पदे 4

गनमॅन - पद 1
(Retired Army Person with Valid Gun License)

- शैक्षणिक पात्रता -
किमान 10वी / 12वी उत्तीर्ण
• संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक अनुभव.
• संबंधित क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

वयोमर्यादा - कमाल 35 वर्षे

इच्छुक उमेदवारांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसांच्या आत ऑफिसच्या वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा.

• संपर्क: मालपाणी इस्टेट, अकोले रोड, कासारादुमाला, संगमनेर- 422605, जि.अहिल्यानगर मो. 8484891804 इमेल- jobs@gmail.com




दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४



वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# उन्हाळ्यात किडनीच्या आरोग्याची काळजी घ्या : डॉ. सागर हासे

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तीव्र उन्हाळा आणि वाढते तापमान यामुळे शरीरातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होते, ज्याचा थेट परिणाम किडनीवर होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी उन्हाळ्यात किडनीच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे मेडिकव्हर हॉस्पिटलच्या नेफ्रोलॉजी विभागातील तज्ज्ञांनी आवाहन केले आहे. किडनी शरीरातील विषारी घटक बाहेर टाकणे, पाण्याचे संतुलन राखणे, रक्तदाब नियंत्रित ठेवणे आणि रक्तातील क्षारांचे प्रमाण योग्य राखणे, अशी महत्त्वाची कार्ये पार पाडते. मात्र, उन्हाळ्यात निर्जलीकरण (डिहायड्रेशन) झाल्यास किडनीवर अतिरिक्त ताण पडतो, ज्यामुळे तिच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.



उन्हाळ्यात किडनीचे संरक्षण करण्यासाठी घ्यावयाच्या उपायांबाबत मार्गदर्शन करताना डॉ. सागर हासे सांगतात : पुरेसे पाणी प्या. दररोज किमान २.५ ते ३ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. तहान लागण्याची वाट पाहू नका. ओआरएस, लिंबूपाणी किंवा ताक यांचे सेवन करा. उष्णतेमुळे शरीरातील क्षार कमी झाल्यास ते भरून काढण्यास मदत होते. जास्त उन्हात फिरणे टाळा. विशेषतः दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे. ताजे व पौष्टिक अन्न खा. फळे, भाज्या, सॅलड आणि नारळपाणी यांचा आहारात समावेश करा. जंक फूड व जास्त मीठ टाळा. जास्त मीठ किडनीवर अतिरिक्त ताण निर्माण करते. वेदनाशामक औषधांचा (पेनकिलर्स) अति वापर टाळा. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय नियमितपणे घेऊ नका. मधुमेह व रक्तदाब नियंत्रणात ठेवा. यामुळे किडनीचे नुकसान होण्याचा धोका कमी होतो. लघवीचा रंग तपासा. गडद पिवळी लघवी हे निर्जलीकरणाचे लक्षण असू शकते. तसेच, पुढे माहिती देताना डॉ. हासे यांनी नमूद केले की, पायांना सूज येणे, चेहऱ्याला सूज येणे, लघवी कमी होणे किंवा जास्त प्रमाणात होणे, लघवीत रक्त जाणे, अशक्तपणा, उलटी होणे, मळमळ होणे, भूक न लागणे, यापैकी कुठली लक्षणे आढळल्यास त्वरित मेडिकव्हर हॉस्पिटलचे किडनीविकार तज्ञ यांना भेटावे.

किडनी आजाराची लक्षणे अनेकदा उशिरा दिसतात. त्यामुळे नियमित तपासणी अत्यंत महत्त्वाची आहे. क्रिएटिनिन (क्रिएटिनिन), जीएफआर आणि युरीन टेस्ट या साध्या रक्त व लघवी तपासणीमधून किडनीचे आरोग्य समजू शकते, असे डॉ. हासे यांनी सांगितले. नागरिकांनी उन्हाळ्यात किडनीच्या आरोग्याबाबत सजग राहावे आणि निरोगी जीवनशैली अंगीकारावी, असे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटलच्या तज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

# थलापती विजय यांचा शपथविधी रखडला

चेन्नई
(वार्ताहर)-
तमिळनाडू मध्ये सत्तास्थापनेचा पेच अजूनही सुटलेला नाही. टीव्हीके प्रमुख विजय थलपती यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीबाबत अद्याप संभ्रम कायम आहे. निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या टीव्हीकेकडे सध्या ११६ आमदारांचा पाठिंबा आहे. मात्र, अजूनही बहुमतासाठी २ आमदारांची गरज आहे. काँग्रेसच्या ५ आमदारांनी टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. तर, डाव्या पक्षांनीही विजय यांना पाठिंबा दिला. मात्र, व्हीसीकेच्या समर्थनाशिवाय सरकार स्थापन करणे शक्य नसल्याचं स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, व्हीसीके आज सकाळी टीव्हीकेला पाठिंबा द्यायचा की नाही, याबाबत निर्णय घेणार आहे.



विजय थलपती यांनी गेल्या दोन दिवसांपासून राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेत सत्ता स्थापनेचा दावा सादर करत आहेत. आवश्यक संख्याबळ आपल्या बाजूने असल्याचा दावा विजय यांनी केला असून, शपथविधीनंतर विधानसभा सभागृहात सहज बहुमत सिद्ध करू, असा विश्वासही त्यांनी राज्यपालांना दिला. मात्र, असं असलं तरी राज्यपाल मात्र बहुमताच्या आकड्यावर अडून असल्याची माहिती आहे. विजय यांनी सरकारला पाठिंबा देणाऱ्या पक्षांची आणि आमदारांची माहिती राज्यपालांकडे सादर केली. सरकार स्थिर राहील आणि कोणतीही राजकीय अस्थिरता निर्माण होणार नाही, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

काल विजय यांनी सलग तिसऱ्या दिवशी राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेत सत्तास्थापनेचा दावा केला. मात्र, अगदी शेवटच्या क्षणी आवश्यक असलेल्या पाठिंब्याच्या पत्राबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने राज्यपालांना शपथविधीची अधिकृत घोषणा पुढे ढकलावी लागली.

मी सत्तास्थापनेपासून कोणालाही थांबवत नाही किंवा अडवत नाही. मी फक्त लोकशाहीचा पुरस्कार करतोय. कोणत्याही पक्षाकडे कितीही आमदार असू देत, मला हेडकाऊंटशी देणंघेणं नाही, फक्त बहुमत हवं.फ डीएमके-अण्णाद्रमुक एकत्र आले आणि त्यांनी बहुमत दाखवलं, तर त्यांनाही संधी देईन. वेळ लागतोय म्हणून जो काही आमदारांचा घोडेबाजार होईल, पण अस्थिर सरकारला मी परवानगी देणार नाही.

पुढचे २-३ दिवस कोणी आले नाही आणि विजयकडे ११८ आमदार नसतील, तर काय? विजयनं फक्त मला ११८ आमदारांचा पाठिंबा आहे, असं सांगितलं. जर त्यांच्याकडे आमदार नसतील आणि मी त्याला शपथ दिली, तर तो आमदारांचा घोडेबाजार नाही का करणार? त्याला कशी परवानगी देऊ? आज-उद्या जो काही आमदारांचा घोडेबाजार झाला, तर त्याच्याशी माझं देणंघेणं नाहीय. सोमवारपर्यंत जर कोणीच सत्तेसाठी आलं नाही, तर काय करणार? इतर पर्यायांचा विचार करणार. त्यावर अजून विचार केला नाहीय, पण कायदेशीर बाजू समजूनच निर्णय घेणार.

# १० वी नंतर पाल्यांच्या प्रवेशासाठी पालकांची धावपळ

## मोठ्या शहरांऐवजी 'संगमनेर' ठरतेय शैक्षणिक पसंती!

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
सध्या १० वी सीबीएसईचे निकाल जाहीर झाले असून, राज्य मंडळाचे (एसएससी) निकालही लवकरच लागण्याची शक्यता आहे. निकालानंतर आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी, विशेषतः नीट आणि जेईई सारख्या स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी पालकांची मोठी ओढाताण सुरू झाली आहे. मात्र, यावर्षी विद्यार्थी आणि पालकांनी पुणे-नाशिकसारख्या मोठ्या शहरांकडे धाव घेण्याऐवजी आपल्या स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या दर्जेदार पर्यायांचा विचार करणे गरजेचे झाले आहे.



नाशिकमधील संभाव्य अडचणी आणि कुंभमेळा - नाशिकमध्ये आगामी 'कुंभमेळ्या'च्या पार्श्वभूमीवर शहरात मोठी गर्दी आणि नियोजित विकासकामे सुरू आहेत. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था आणि दैनंदिन नियोजनावर मोठा ताण येणार आहे. कोचिंग क्लासेसच्या वेळापत्रकात आणि विद्यार्थ्यांच्या प्रवासात अनेक तांत्रिक अडचणी येण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत, घरापासून दूर राहून गर्दी आणि प्रदूषणाचा सामना करणे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर आणि अभ्यासावर विपरीत परिणाम करू शकते.

संगमनेर : शिक्षणाचे नवे 'हब' - एकेकाळी कोटा किंवा लातूरला जाणारा विद्यार्थ्यांचा ओघ आता संगमनेरकडे वळताना दिसत आहे. आज संगमनेर शैक्षणिक क्षेत्रात एक प्रमुख 'हब' म्हणून नावारूपास आले आहे. येथील नामवंत संस्थांनी कोटा आणि लातूरच्या धर्तीवर अत्याधुनिक शिक्षण पद्धती, तज्ज्ञ फॅकल्टी आणि अद्ययावत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

पालकांनी संगमनेरला पसंती देण्याची प्रमुख कारणे :

उत्कृष्ट निकाल : गेल्या काही वर्षांत संगमनेरमधील नामांकित इन्स्टिट्यूटने नीट आणि जेईईमध्ये राष्ट्रीय स्तरावर यश मिळवून स्वतःचा दर्जा सिद्ध केला आहे. वैयक्तिक लक्ष : मोठ्या शहरांतील हजारो विद्यार्थ्यांच्या गर्दीत मुलांकडे दुर्लक्ष होण्याऐवजी, संगमनेरमध्ये मर्यादित विद्यार्थी संख्या आणि वैयक्तिक मार्गदर्शनावर (पर्सनल अटेन्शन) भर दिला जातो. सुरक्षित आणि तणावमुक्त वातावरण : मुलांचे होणारे शारीरिक हाल थांबवून, घरच्या वातावरणात किंवा घराच्या जवळ राहून विद्यार्थी तणावमुक्त पद्धतीने अभ्यास करू शकतात. यामुळे पालकांचा आर्थिक भारही कमी होत आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील जाणकारांच्या मते, स्पर्धा परीक्षेच्या काळात विद्यार्थ्याला मानसिक स्थैर्य मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. मोठ्या शहरांतील धावपळ आणि राहण्या-खाण्याचे हाल विद्यार्थ्यांची एकाग्रता भंग करू शकतात. त्याऐवजी, संगमनेरमध्ये प्रगत आणि दर्जेदार शिक्षण मिळत असताना लांब जाण्याचा धोका पत्करू नये. आपल्या पाल्याचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि त्याला योग्य शैक्षणिक दिशा देण्यासाठी संगमनेरमधील प्रगत इन्स्टिट्यूटमध्येच प्रवेश घेण्याचे आवाहन शिक्षणतज्ज्ञांकडून करण्यात येत आहे.

# दत्त मंदिरात आमदार खताळ यांच्या हस्ते सपत्नीक महामृत्युंजय पूजन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप-शिवसेना महायुती, संगमनेर यांच्या वतीने संगमनेर बस स्थानकातील दत्त मंदिरात महामृत्युंजय पूजन, सप्त चिरंजीव व नक्षत्र देवता पूजन, नवग्रह हवन, आयुष्य मंत्रपठण, रुद्र पूजन तसेच मार्कंडेय आराधना आदी धार्मिक विधी अत्यंत मंत्रोच्चारात पार पडले.



आमदार अमोल खताळ आणि पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते हा विधी करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य वैभव उपासनी व कैलास जोशी यांनी केले. त्यांनी सर्व विधी शास्त्रोक्त पद्धतीने पार पाडत उपस्थित भाविकांना धार्मिक विधींचे महत्त्वही सांगितले. त्यांच्या मंत्रोच्चारांमुळे संपूर्ण परिसरात प्रसन्न आणि पवित्र वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी आमदार अमोल खताळ पाटील यांना वाढदिवसाच्या निमित्त शुभेच्छा देण्यासाठी दत्त मंदिर परिसरात नागरिक, कार्यकर्ते व समर्थकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. यावेळी आमदार खताळ यांनी सर्वांच्या शुभेच्छा स्वीकारत मनमोकळा संवाद साधला. त्यामुळे कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

हा धार्मिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आमदार अमोल प्रताप पाटील मित्र मंडळाचे वरद बागुल, रोहित चौधरी, ऋषिकेश मुळे, विनायक तांबे, राहुल सोमवंशी, नानासाहेब पर्बत व श्यामसुंदर जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपस्थितांना फळे आणि थंडगार सरबत वाटप करण्यात आले.

# कृत्रिम बुद्धिमत्तेची पर्यावरणीय किंमत

# ई-कचऱ्याच्या विळख्यात डिजिटल जग

कृत्रिम बुद्धिमत्तेचा, म्हणजेच एआयचा, झपाट्याने वाढणारा विस्तार आता जगभरात विकासाचे प्रतीक मानला जात असला, तरी त्याच्या पर्यावरणीय परिणामांकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरत आहे. डिजिटल युगातील प्रगती, डेटा सेंटर्सची उभारणी आणि क्लाऊड सेवांचा विस्तार यामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अधिक शक्तिशाली झाले आहे. मात्र, या विकासामागे निसर्गावर वाढत चाललेला ताण आता गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. वाढते कार्बन उत्सर्जन, प्रचंड प्रमाणात होणारा पाण्याचा वापर आणि झपाट्याने वाढणारा इलेक्ट्रॉनिक कचरा हे या क्षेत्रासमोर उभे राहिलेले मोठे प्रश्न आहेत. विशेषतः ई-कचऱ्याच्या संकटाकडे अद्याप पुरेसे गांभीर्याने पाहिले गेलेले नाही.



इंटरनॅशनल एनर्जी एजन्सीच्या २०२५ च्या अहवालानुसार, २०१७ पासून डेटा सेंटर्सच्या वीज वापरामध्ये दरवर्षी सुमारे १२ टक्क्यांनी वाढ होत आहे. चिंतेची बाब म्हणजे, या उर्जेचा जवळपास ६० टक्के भाग अजूनही जीवाश्म इंधनांवर आधारित आहे. त्यामुळे कार्बन उत्सर्जनाचा वेग वाढत आहे. दुसरीकडे, या डेटा सेंटर्सना थंड ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर केला जातो. जागतिक स्तरावर डेटा सेंटर्स दरवर्षी सुमारे ५६० अब्ज लिटर पाणी वापरत असल्याचा अंदाज आहे, आणि २०३० पर्यंत ही संख्या १.२ ट्रिलियन लिटरपर्यंत पोहोचू शकते. एका समिक्षित अभ्यासानुसार, एआय-आधारित डेटा सेंटर्सचा वार्षिक पाणी वापर हा जगातील बाटलीबंद पाण्याच्या वापरापेक्षाही अधिक झाला आहे. ही आकडेवारी केवळ तांत्रिक प्रगतीची नाही, तर संसाधनांवरील वाढत्या दडपणाची देखील आहे.

मात्र, पर्यावरणीय चर्चेत सर्वाधिक दुर्लक्षित राहिलेला मुद्दा म्हणजे इलेक्ट्रॉनिक कचरा. एआयशी संबंधित हार्डवेअरचा वापर कालावधी अत्यंत कमी असतो. जीपीयू, सर्व्हर्स आणि प्रगत चिप्स साधारणतः दोन ते पाच वर्षांत बदलले जातात. नवीन तंत्रज्ञान येताच जुनी उपकरणे निरुपयोगी ठरतात. परिणामी, मोठ्या प्रमाणावर ई-कचरा निर्माण होतो. अंदाजानुसार, केवळ जनरेटिव्ह एआयमुळेच २०३० पर्यंत सुमारे ५० लाख मेट्रिक टन ई-कचरा निर्माण होऊ शकतो. हा कचरा केवळ आकड्यांपुरता मर्यादित नसून त्यातून जड धातू, विषारी रसायने आणि प्रदूषक घटक पर्यावरणात मिसळतात.

भारतासारख्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. देशात आधीच कचरा व्यवस्थापनाची समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये भारताने १.७५ लाख मेट्रिक टन ई-कचरा निर्माण केला. मात्र, त्याच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक औपचारिक प्रक्रिया क्षमता अत्यंत अपुरी आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या २०२६ मधील अहवालानुसार, देशातील १७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एकही नोंदणीकृत पुनर्प्रक्रिया सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील ई-कचरा अनौपचारिक क्षेत्रात जातो. या ठिकाणी कचऱ्याची सुरक्षित हाताळणी न होता तो उघड्यावर जाळला जातो किंवा टाकून दिला जातो.

दिल्लीतील मंडोली औद्योगिक परिसरात करण्यात आलेल्या संशोधनातून या संकटाची तीव्रता स्पष्ट होते. येथे भूजलामध्ये जड धातूंचे प्रमाण भारतीय मानकांपेक्षा आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या मर्यादेपेक्षा अधिक आढळले. पुनर्वापरयोग्य नसलेले इलेक्ट्रॉनिक घटक जाळल्याने डाइऑक्सिन्स, पीएम-१० आणि इतर घातक धातू हवेत मिसळतात. यामुळे हवा, माती आणि पाणी तिन्ही माध्यमांद्वारे प्रदूषण वाढते. या भागातील लोकसंख्या आधीच कोळशावर चालणाऱ्या ऊर्जा प्रकल्पांमुळे आणि भूजलाच्या अतिवापरामुळे त्रस्त आहे. अशा परिस्थितीत डेटा सेंटर्समुळे वाढणारा पर्यावरणीय भार आणखी धोकादायक ठरतो.

भारताने अलीकडील एआय इम्पॅक्ट समिटमध्ये जागतिक डेटा भारतात साठवण्याचे आवाहन केले आहे. डेटा सार्वभौमत्वाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात असले, तरी त्यासाठी उभारल्या जाणाऱ्या डेटा पायाभूत सुविधांचा पर्यावरणावर होणारा परिणाम अधिक गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. सध्या अमेरिका एकटीच जगातील डेटा सेंटर क्षमतेपैकी ४४ टक्के वाटा राखून आहे. त्यामुळे विकसनशील देशांमध्ये स्वतःच्या डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्याची महत्त्वाकांक्षा वाढली आहे. मात्र, या विकासाचा अर्थ केवळ अधिक डेटा सेंटर्स उभारणे असा नसावा. कारण, डेटा सेंटर्स हे अत्यंत संसाधन-आधारित क्षेत्र आहे. त्यांची ऊर्जा गरज, शीतकरणासाठी लागणारे पाणी आणि निर्माण होणारा ई-कचरा यांचा एकत्रित परिणाम पर्यावरणावर प्रचंड ताण निर्माण करतो.

याहून गंभीर बाब म्हणजे, सरकारकडून या क्षेत्राला प्रोत्साहन देताना पर्यावरणीय जबाबदाऱ्यांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नाही. केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये भारतीय डेटा सेंटर्सद्वारे क्लाऊड सेवा पुरवणाऱ्या परदेशी कंपन्यांना २०४७ पर्यंत करसवलती देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. मात्र, या गुंतवणुकीसोबत कडक पर्यावरणीय अटी घालण्याची गरज आहे. ई-वेस्ट व्यवस्थापन नियम २०२२ अंतर्गत उत्पादकांची जबाबदारी, अधिकृत पुनर्प्रक्रिया सुविधा आणि प्रादेशिक पातळीवरील कचरा प्रक्रिया केंद्रे अनिवार्य करणे आवश्यक आहे. अन्यथा, हा विकास पर्यावरणासाठी दीर्घकालीन संकट निर्माण करू शकतो.

पुनर्प्रक्रिया ही या समस्येचे पूर्ण समाधान नाही, हेही वास्तव आहे. अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे पुनर्प्रक्रियेचा विचार करून तयार केली जात नाहीत. त्यांची रचना आणि पुनर्प्रक्रियेचा खर्च यामुळे प्रक्रिया आर्थिकदृष्ट्या अवघड ठरते. त्यामुळे केवळ पुनर्प्रक्रियेवर अवलंबून राहून या संकटावर मात करणे शक्य नाही. हार्डवेअरचा वापर कालावधी वाढवणे, जबाबदार उत्पादन प्रणाली विकसित करणे आणि संसाधनांचा नियंत्रित वापर करणे हीच काळाची गरज आहे.

# दहावीनंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेला वेग; पहिली गुणवत्ता यादी २६ मे रोजी

मुंबई
(युवावार्ता प्रतिनिधी)-
इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होताच, शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार, विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाच्या अर्जाचा दुसरा भाग ११ मेपासून भरता येणार आहे. तर, प्रवेशाची तात्पुरती गुणवत्तायादी १५ मे रोजी, तर पहिली गुणवत्तायादी २६ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. गतवर्षीपासून अकरावी प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचण येऊ नये, यासाठी शिक्षण संचालनालयाने १० एप्रिलपासून अर्जाचा भाग १ भरण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार, ८ मेपर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग १ भरून नोंदणी केली आहे.




दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच, शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरीता विशेष पाचवी फेरी राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेचे जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, ८ ते १० मे या कालावधीत विद्यार्थी नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाईन सादर करता येईल.

११ ते २० मेदरम्यान शून्य फेरी राबविण्यात येणार आहे. व्यवस्थापन, इन-हाऊस, अल्पसंख्याक कोट्यासाठी ११ ते १३ मेदरम्यान विद्यार्थ्यांना शून्य फेरीसाठी अर्जाचा भाग २ भरता येणार आहे. १५ मे रोजी तात्पुरती गुणवत्तायादी जाहीर करण्यात येईल. या गुणवत्तायादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती सादर करता येणार आहेत. १८ मे रोजी सर्वसाधारण गुणवत्तायादी अंतिम करण्यात येणार आहे. तसेच, शून्य फेरीसाठी जागांचे वाटप करण्यात येणार आहे.

२० मे रोजी पहिल्या फेरीसाठी कोट्यांच्या जागांसह रिक्त जागांचा तपशील जाहीर करण्यात येणार आहे. पहिल्या फेरीला २१ मेपासून सुरुवात होणार असून, २१ ते २२ मेदरम्यान विद्यार्थ्यांना अर्जाच्या भाग १ मध्ये बदल करणे, भाग २ भरता येणार आहे. त्यानंतर, २६ मे रोजी पहिली फेरी जाहीर करण्यात येईल. या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना २६ ते २८ मे या कालावधीत महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यावा लागणार आहे. २९ मे रोजी रिक्त जागा प्रदर्शित करण्यात येणार असून, ३० मे रोजी दुसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

आपल्या व्यावसयाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यावसयाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# बारा वर्षांनंतर गाजलेल्या अपहरण प्रकरणाचा निकाल; सर्व आरोपी निर्दोष

युवावार्ता (प्रतिनिधी)

तब्बल १२ वर्षे न्यायप्रविष्ट असलेल्या एका गाजलेल्या अपहरण व अत्याचार प्रकरणात संगमनेर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने अखेर महत्त्वपूर्ण निकाल देत सर्व सात आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश विवेक बी. गव्हाणे यांनी शुक्रवारी (दि. ८ मे २०२६) हा निकाल दिला.



या प्रकरणातील मुख्य आरोपी राहुल भैय्याजी बागडे याच्यासह त्याच्या कुटुंबीयांवर आणि नातेवाईकांवर अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला होता. आरोपींच्या वतीने अ‍ॅड. सीमा काळे-सातपुते यांनी प्रभावी युक्तिवाद केला, तर त्यांना अ‍ॅड. सुजाता गोडसे यांनी सहकार्य केले. या खटल्याची पार्श्वभूमी २०१४ सालातील असून, त्यावेळी पीडित मुलगी १७ वर्षे ६ महिने वयाची होती. फिर्यादी पक्षाच्या आरोपानुसार, राहुल बागडे याने मुलीला लग्नाचे आणि सुखी संसाराचे आमिष दाखवून पळवून नेले होते. या काळात पीडिता गर्भवती राहिली होती. ऑगस्ट २०१५ मध्ये ती पुन्हा पालकांकडे परतल्यानंतर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला आणि संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात भारतीय दंड विधानातील कलम ३७६ (२)(एन), ३६३, ३६६(अ), ३४ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ३ व ४ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने पीडित मुलगी, तिचे आई-वडील आणि वैद्यकीय अधिकारी अशा चार साक्षीदारांची साक्ष नोंदवली. मात्र, प्रत्यक्ष न्यायालयीन सुनावणीत या प्रकरणाला मोठे नाट्यमय वळण मिळाले. पीडित मुलीने न्यायालयात दिलेल्या साक्षीत आरोपीला आपण ओळखत नसल्याचे सांगितले. तसेच आपल्यावर कोणताही अत्याचार झाला नसल्याचे स्पष्ट करत तिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अंतर्गत दिलेला पूर्वीचा जबाबही फेटाळून लावला. धक्कादायक बाब म्हणजे, पीडितेच्या आई-वडिलांनीही न्यायालयात आरोपींविरोधात कोणताही ठोस पुरावा दिला नाही. उलट, मुलीचे अपहरण झाल्याचा आरोपच त्यांनी नाकारला.

न्यायालयाने आपल्या निकालपत्रात नमूद केले की, केवळ साक्षीदारांनी फिरवलेली भूमिका नव्हे, तर सादर करण्यात आलेला डीएनए अहवालही आरोपींना दोषी ठरविण्यासाठी पुरेसा ठरत नाही. रक्ताचे नमुने कोणाच्या उपस्थितीत घेण्यात आले, ते प्रत्यक्षात पीडित व आरोपींचेच होते का, याबाबत ठोस पुरावा सादर करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याने डीएनए चाचणीचा निष्कर्ष ग्राह्य धरता येत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालानुसार राहुल बागडे, इंदिरा बागडे, वनिता बागडे, नरेंद्र गजभिये, प्रगती गजभिये आणि नीता पानतावणे (सर्व रा. नागपूर) यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. दरम्यान, आरोपी भैय्याजी बागडे यांचे निधन झाल्यामुळे त्यांच्यावरील खटला यापूर्वीच बंद करण्यात आला होता. मुख्य आरोपी राहुल बागडे हा सध्या कारागृहात होता.

न्यायालयाने या निकालासोबतच सर्व आरोपींचे जामीन रोखे रद्द करण्याचे तसेच मुदत संपल्यानंतर या प्रकरणातील मुद्देमाल नष्ट करण्याचे आदेशही दिले आहेत.

# १२ क्विंटल कांदा विकूनही शेतकऱ्यालाच उलट १ रूपया व्यापाऱ्याला द्यावा लागला

युवावार्ता (प्रतिनिधी)


एकीकडे अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान होणे आता नवीन राहिले नाही. तरी या संकटाला तोंड देऊन शेतकरी कसं बसं पिक घेतो. पण जेव्हा मार्केटमध्ये विक्रीला जातो तिथेही थट्टा उडवण्याचा प्रकार घडतो.

शेतमालाला भाव किती कमी असू शकतो, याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका शेतकऱ्याने १२६२ किलो कांदा विकला. पण या शेतकऱ्याला एक रुपयाही यात मिळाला नाही. उलट अडत्याला उलट १ रुपये द्यावा लागला.

राज्यात सध्य कांद्याचे भाव कोसळले आहे. कांद्याला १ रुपया भाव मिळत असल्यामुळे शेतकरी आंदोलन करत आहे. अशातच छत्रपती संभाजीनगरच्या पैठण तालुक्यातील वरुडी गावातील शेतकरी प्रकाश गलधर यांनी १२ क्विंटल कांदा अत्यंत आशने बाजार समितीत विक्रीसाठी आणला.

रक्ताचं पाणी करून पिकवलेला हा कांदा सोन्यासारखा भाव देईल, अशी अपेक्षा होती. मात्र, कांद्याचे पडलेले दर पाहता या शेतकऱ्याच्या पदरात कांदा विक्रीचे पैसे मिळणे तर लांबच, पण प्रकाश गलधर यांना आपल्या खिशातून 'एक रुपया' बाजार समितीला भरावा लागला. ही घटना म्हणजे राज्यातील कृषी व्यवस्थेचा आणि कोसळलेल्या दरांचा जिवंत पुरावा आहे.

१२ क्विंटल कांदा मी काढला होता. तो विकण्यासाठी घेऊन गेलो, पण अडत्याला हमाली, तोलाई, भाडे देऊन हातात एक रुपया मिळाला नाही. माणसाला वाटतं पैसे आले पाहिजे. माझ्या मागे लग्नाची देणी होती, पोरीचं लग्न झालं, ५-६ लाख रुपये देणे आहे. पण, हातात एक रुपया आला. माझीच परिस्थिती नाही तर गावात सगळ्यांची परिस्थितीत आहे. कुठे ३ रुपये ४ रुपये भाव मिळत आहे, तोही चांगला कांदाा असेल तर कुठे थोडा खराब असेल तर २ रुपये भाव मिळत आहे, अशी व्यथा शेतकरी प्रकाश गलधर यांनी मांडली. दरम्यान संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारात कांद्याला प्रति किलो केवळ १ रुपया भाव मिळाल्याने शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला. संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडत थेट रस्त्यावर उतरून वडगावपान-तळेगाव फाटा येथे जोरदार 'रास्ता रोको' आंदोलन केले.



## १ रुपया व्यापाऱ्याला कसा द्यावा लागला?

**प्रकाश गलधर यांनी १२६२ किलो म्हणजे जवळपास १२ क्विंटल कांदा घेऊन आले होते. कांद्याला भाव हा १०० रुपये लावण्यात आला. यामध्ये हमाली १२५ रुपये द्यावी लागली, तोलाई खर्च ३८ रुपये, भराई २५ रुपये, वाराई २५ रुपये, गोणी ५५० रुपये आणि भाडे ५०० रुपये द्यावे लागले होते. त्यामुळे एकूण रक्कम ही १२६२ होती आणि वजा खर्च हा १२६३ रुपये निघाला. त्यामुळे १ रुपये शेतकऱ्याला द्यावा लागला.**

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्र
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# जिल्हा बँक भरतीत आता स्थानिकांनाच संधी

मुंबई (वृत्तसंस्था)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने भूमिपूत्रांच्या रोजगारासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. या पुढे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील नोकर भरती करताना ७० टक्के जागा संबंधित जिल्ह्यातील स्थानिक भूमिपूत्रांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. सहकार विभागाने शुक्रवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्याच जिल्ह्यात नोकरीची संधी मिळणार आहे.

राज्य सरकारने स्थानिक भूमिपूत्रांना रोजगार देण्यासाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील रिक्त पदांची भरती करताना आता संबंधित जिल्ह्यातील स्थानिक भूमिपूत्रांना संधी दिली जाणार आहे. राज्यात सध्या ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. या प्रामुख्याने शेतकरी आणि ग्रामीण विकास संस्थांशी जोडलेल्या आहेत. या जिल्हा सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र आणि सभासद त्या-त्या विशिष्ट जिल्ह्यापुरतेच मर्यादित असते. या बँकांना स्थानिक बोलीभाषा, भौगोलिक परिस्थिती आणि ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असलेले कर्मचारी मिळाल्यास या बँकांच्या ग्राहकांना आणि सभासदांना चांगली दर्जेदार सेवा देता येईल. या उद्देशाने सरकारने हा बदल केला आहे. जिल्हा बँकांना नोकरभरती करताना यापुढे नवीन कार्यपद्धतील लागू करण्यात आली आहे. त्याप्रमाणे संबंधित बँकेचे कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यातील मूळ रहिवासी (डोमिसाइल प्रमाणपत्र धारक) उमेदवारांना यापुढे नोकरीत ७० टक्के जागा राखीव राहणार आहे.उर्वरित ३० टक्के जागांवर जिल्ह्याबाहेरील उमेदवार अर्ज घेऊ शकतात. जर या ३० टक्के कोट्यात जिल्ह्याबाहेरील उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर त्या जागा देखील स्थानिक उमेदवारांमधून भरण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, ज्या बँकांनी या निर्णयाच्या आधी भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे, परंतु ज्यांची भरतीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा बँकांनाही हा नवीन ७०:३० चा नियम पाळावा लागणार आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस | सुसज्ज ऑपरेशन थिएटर | सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे | अत्याधुनिक लॅब | अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25